फेब्रुवारी २००४

# बुडीत कर्जे आणि तोटे जमा खर्चातुन काढण्यासाठी कायदेशीर पध्दत

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण बिगरशेती आणि नागरी सहकारी पतसंस्था ह्या थकित झालेली कर्जे वसूल करणेसाठी दिवसेंदिवस प्रयत्नांची पराकष्टा करीत आहेत. थकित कर्जदार व जामीनदार यांना प्रत्यक्ष भेटणे, त्यांना थकित रक्कम भरणेसाठी नोटीसा पाठविणे, कलम ९१ किंवा १०१ खाली थकीत कर्ज वसुलीसाठी दावा दाखल करुन कोर्टाचा हुकूमनामा (ॲवार्ड) मिळविणे, मिळालेल्या हुकूमनाम्याची विशेष वसुली व विक्री अधिकारी (एस.आर.ओ)व्दारे अंमलबजावणी करणे, मालमत्तेवर टाच आणणे, मालमत्तेचा लिलाव करणे इत्यादी कायदेशीर बाबींचा अवलंब करुनही अनेक थकित कर्जे वसुल होत नाहीत. अशा प्रकाराची रास्त खंत अनेक पतसंस्थांना अलिकडच्या काळात भेडसावत आहेत. आणि अशा परिस्थितीमुळे, थकबाकीचे प्रमाण वाढल्यामुळे इतर कामकाजांवर निश्चितपणे परिणाम होत आहे. आणि अशा वेळी नेमके काय करायचे असा प्रश्न पतसंस्थांमध्ये काम करणारे पदाधिकारी, संचालक व पतसंस्थचे अधिकारी / कर्मचारी यांना त्रस्त करुन टाकीत आहे. आणि नेमका याच परिस्थितीचा या क्षेत्रातील व याक्षेत्राशी संबंधित दलाल व त्यांचे माध्यमातुन सहकार खात्यातील काही अधिकारी आपले उखळ पांढरे करुन घेण्यासाठी पतसंस्थांना नोटीसा पाठवून, लेखा परिक्षणाचे वेळी भितीसदृश्य वातावरण तयार करुन **थकबाकी वसुलीचा मार्ग न दाखविता पैशांची सर्रास मागणी केली जात आहे.** आणि अडचणीच्या काळात कारवाईचा बडगा टाळणेसाठी पतसंस्था याला बळीही पडतात. आणि हे सर्व होवू नये व पतसंस्थांची अशा प्रकारच्या बुडीत कर्जासंदर्भात महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यामध्ये काही तरतुदी आहेत काय किंवा यावर काही उपाय आहेत काय, याची माहिती असणे आवश्यक असल्यामुळे व **२००३ -२००४** हे आर्थिक वर्ष संपायला **केवळ दिड महिना शिल्लक राहिल्यामुळे** व भविष्यकाळातही याचा उपयोग व्हावा म्हणून,बुडीत कर्जे व तोटे जमा खर्चातुन काढून ठाकण्यासाठी खालील कायद्यातील तरतुदी व पध्दत सादर करीत आहोत.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ कलम ४९ नुसार संस्थांची मालमत्ता व निधी या सदराखाली बुडीत कर्जे आणि तोटे जमा खर्चातून काढून टाकण्याची कायदेशीर तरतुद केलेली आहे.प्रयत्न करुनही जौ थकित कर्जे वसुल होत नाहीत, आणि लेखापरिक्षकाने कलम ८१ नुसार जी कर्जे बुडीत कर्जे म्हणून प्रमाणित केली आहेत,अशी सर्व व्याजासहीत कर्जे व वसुलीचा खर्च सुरवातीला बुडीत कर्जे निधीत टाकावा व एवढे करुनही काही रक्कम शिल्लक राहत असेल तर ती रक्कम भागभांडवल आणि रिझर्व फंडाच्या खर्च खाती टाकावी. त्याचप्रमाणे इतर देणी असलेल्या सर्व रकमा संचित तोट्याच्या रकमा व तोटा वसुल होत नसेल **''अशा सर्व रकमा ज्या वसुल होणे अशक्य आहे ''** अशा सर्व रकमा लेखापरिक्षकांकडून प्रमाणीत करुन घ्याव्यात आणि तद्‌नंतर अशा रकमा भागभांडवल व रिझर्व्ह फंड यांच्या खर्च खाती टाकाव्यात.

**परंतु सर्वात महत्वाची बाब ह्या प्रकारणात अशी आहे की, अशी बुडीत कर्जे किंवा तोटा ह्यांस सभासंदाच्या साधारण सभेकडून मंजुरी घ्यायला पाहिजे.त्याशिवाय अशी बुडीत कर्जे आणि**

**तोटे,जमाखर्चातून काढता येणार नाहीत.तसेच अशा पतसंस्थेंने आपल्या जिल्हा मध्यवर्ती बँकेची ती कर्जदार असल्यास,बँकेची संमती मिळवून सहकार निबंधकाची लेखी संमती देखील मिळविणे आवश्यक आहे.** आणि जर ती जिल्हा बँकेची कर्जदार नसेल तर त्यासाठी केवळ निबंधकाची संमती मिळवावी.परंतु ह्यात हेही लक्षात ठेवणे आवश्यक आहे.की,मागील वार्षिक हिशेब तपासणीच्या वेळी पतसंस्था ''**अ**''वर्गात असेल व बुडीत कर्जे खास निर्माण केलेल्या बुडीत निधीतुन टाकावयाची असतील तर परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.सहकार निबंधकाला संमती देताना काही अटी व शर्ती टाकण्याचा अधिकार आहे हे पतसंस्थांनी विसरता कामा नये.

ज्यावेळी सहकार खात्यातील निबंधकाचा या कामी संबंध येतो, त्यावेळी पतसंस्था व त्यामध्ये काम करणारे पदाधिकारी व संचालक यांनी **कुठल्याही परिस्थितीत मोहाला व कुठल्याही दबावाला बळी पडता कामा नये.** आणि केवळ सहकार खात्याचा अधिकारी व त्यांचे अधिकार आहेत म्हणून आणि ते तोंडी सांगतात म्हणून आणि त्याचप्रमाणे मागणी पुर्ण करु नये. वेळ पडल्यास कायदेशीर आव्हान देण्यासाठी जरुर तयारी ठेवावी.आणि ही क्षमता लहान संस्था किंबहूना मोठ्या संस्था सुध्दा भविष्यातील कलम ७८,कलम ८३ व कलम ८८ याचा बडगा आपल्यावर अधिकाराचा गैरवापर करुन केला जाईल,अशी ज्यावेळेस भिती वाटेल त्यावेळेस, थेट माझ्याशी मोबाईल क्र. ९८२०२८०६६६ वर कुठल्याही क्षणी संपर्क करावा, निश्चितपणे मार्गदर्शन केले जाईल.

अशाप्रमाणे जर, न येणारी **बुडीत कर्जे पतसंस्थाच्या जमाखर्चातून काढली तर** पतसंस्था पुढील कर्जे अत्यंत चोखपणे व कर्ज परतफेडीची क्षमता बघुन,पतसंस्थेच्या उपविधीनुसार व सहकार कायद्याचा आधार घेऊन वाटप करतील व भविष्यात अशी कुठलीही कर्जे कुठल्याही परिस्थितीत थकीत होणार नाहीत. यामुळे आपल्या पतसंस्थांच्या चळवळीस आणखी चांगले वैभवशाली दिवस येतील, असा प्रचंड आत्मविश्वास दिवसेंदिवस वाढत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**